# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No.MISC-2007/(322/07) UNI-4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016 (Maharashtra Act. No. VI of 2017

## Department of Innovation, Incubation and Linkages

M.I.D.C. Road, Complex, Gadchiroli - 442605 (M. S.)

Phone: 07132-223120 (o), Mob. 9822469609 E-Mail: diilgug@gmail.com

No./GUG/DIIL/ 139 /2019 Date: 18/02/2019

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषयः– **श्रेयस शिकाऊ उमेदवार योजनेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नोंदणी बाबत.**
संदर्भः– संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पुणे यांचे श्रेयस योजनेच्या अंमलबजावणी बाबतचे पत्र क्र. संकीर्ण–२०१८/प्र.क्र.१४९/विशि–२ दिनांक १४/२/२०१९.

उपरोक्त संदर्भाकीत विषयानुसार सादर करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील अतांत्रिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी श्रेयस (SHREYAS) ही शिकाऊ उमेदवार योजना भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभाग, मानव संसाधन मंत्रालयातर्फे सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणी करीता श्रेयस (SHREYAS) पोर्टल www.shreyas.ac.in तयार करण्यात आले आहे.

सदर योजने अंतर्गत महाविद्यालयांना दिनांक २७/२/२०१९ ते दिनांक २५/३/२०१९ या कालावधी मध्ये पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर आपल्या महाविद्यालयातील अतांत्रिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नाव नोंदणी दिनांक २५/३/२०१९ पर्यन्त पुर्ण करणे आवश्यक आहे. मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार यांचे नुसार सदर पोर्टल दिनांक २७/२/२०१९ पासुन ३० दिवसांकरीता कार्यान्वित राहील.

### श्रेयस योजनेचे ठळक वैशिष्टे

श्रेयस (SHREYAS) ही शिकाऊ उमेदवार योजना अतांत्रिक म्हणजेच कला, वाणिज्य, विज्ञान, इतर तत्सम् विद्याशाखा व अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांकरीता रोजगारश्रम असलेले कौशल्य प्राप्ती व शिकाऊ उमेदवारी बद्दल प्रोत्साहन देणे इत्यादी बाबींचा अंर्तभाव करून रोजगारनिर्मीती करणे अशी उद्दिष्ये आहेत.

### तीन पथकीय श्रेयस योजना अंमलबजावणी कार्यक्रम

**१) ॲड ऑन शिकाऊ उमेदवारी** – पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थी सदर पोर्टलवर क्षेत्रीय कौशल्य परिषदेने विहित केलेल्या यादीतील पसंतीची कामाविषयक भुमिका निवड करून अर्ज भरण्याची मुभा देण्यात आलेली आहे. शिकाऊ उमेदवारी

६ महिने कालावधीची असुन पदवी शिक्षण संपल्यानंतर लगेच म्हणजेच दरवर्षातील मे महिन्यापासुन सुरू होणार. शिकाऊ उमेदवारी दरम्यान मासिक ६०००/— रूपये एवढी छात्रवृत्ती मिळणार. शिकाऊ उमेदवारी अंती क्षेत्रीय कौशल्य परिषदेतर्फे चाचणी घेवुन यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवी व्यतिरीक्त संबधित उद्योग श्रेत्रातील कौशल्य प्रमाणपत्र मिळणार.

**२) अभ्यसक्रमा अंतर्गत शिकाऊ उमेदवारी** – ज्या महाविद्यामध्ये बॅचलर ऑफ व्होकेशनल (B.Voc.) अभ्यासक्रम चालविले जातात अशा ठिकाणी सदर अभ्यासक्रमाची B.A.(Professional), B.Com.(Professional) व B.Sc.(Professional) मध्ये पुर्नरचना करण्यात येईल. अशा प्रकारे सदर अभ्यासक्रमात कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षणासोबत शिकाऊ उमेदवारी चा सुध्दा लाभ मिळेल.

**३) राष्ट्रीय व्यवसाय सेवा** (National Career Service), **श्रम मंत्रालय, भारत सरकार पोर्टल सोबत महाविद्यालयाची नोंदणी/जोडणी** – राष्ट्रीय व्यवसाय सेवा मध्ये सध्या पर्यन्त देशाअंतर्गत ९००० हुन अधिक नियोक्त्यांनी जवळपास २ लक्ष ऐवढी विविध रोजगारांची मागणी केलेली आहे. ज्या महाविद्यालयातील परिसरामध्ये योग्य व्यक्तिस योग्य नौकरी देण्याची व्यवस्था नसुन सदर महाविद्यालयाची राष्ट्रीय व्यवसाय सेवा सोबत जोडणी केल्यास महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्याची रोजगार संबधीची संधी वृध्दी होण्यास मदत होणार व मार्गदर्शन मिळणार.

अशाप्रकारे साल २०२२ पर्यंन्त एकुण ५० लक्ष विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

करीता आपणास वरील नमुद योजनेचे वैशिष्टये व बाबींच्या आधारावर त्वरीत व वेळेपुर्वी कार्यवाही घेवुन प्रवेशित पदवी अभ्यासक्रमातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ देण्यात यावा असा सानुग्रह.

धन्यवाद!

**प्रा. मनिष द. उत्तरवार**
संचालक (न.न.व सा.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली